# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

**Dr. Priya Gedam**
**Director Students' Development (I/c.)**
**Ph. No. -**

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org
**Email :** nssdsw.gug@ gmail.com

**पत्र क्र. No.GU/DSW / 1531 /2020** **Dt: 15 /07/2020**

प्रति,
मा. प्राचार्य / विभागप्रमुख,
संलग्नीत सर्व महाविद्यालये व विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :– विद्यार्थी आर्थिक सहायता निधी (सत्र २०२०–२०२१) मधून आर्थिक मदतीकरीता विद्यार्थ्यांचे प्रस्ताव पाठविण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपनास कळविण्यात येते की, संलग्नीत महाविद्यालये व विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील गरीब, गरजु व पात्र विद्यार्थ्यांना विद्यार्थी आर्थिक सहायता निधी मधून शिक्षण घेण्यासाठी बसपास सवलत खर्च, परीक्षा शुल्क, वसतीगृहातील राहण्याचा व जेवणाचा खर्च, पुस्तकांचा व ईतर शैक्षणिक साहित्यांची खरेदी यासाठी नियमावलीनुसार मदत देण्याची तरतुद करण्यात आली आहे.

विद्यार्थी आर्थिक सहायता निधीची नियमावली प्रवेशित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन दयावी. सदरहु निधीतुन आर्थिक मदत घेण्यासाठी ईच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र विहीत नमुन्यात आवश्यक कागदपत्रासह नियमावलीनुसार भरून व स्वत:ह प्रमाणित व साक्षांकीत करून दिनांक ३० जानेवारी २०२१ पर्यत संचालक, विद्यार्थी विकास विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या कार्यालयात प्रस्ताव पाठवावे. दिनांक ३० जानेवारी २०२१ ही आवेदनपत्र स्विकारण्याची अंतीम तारीख असून या तारखेनंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकृत केले जानार नाही. तसेच आवेदनपत्र अपुर्ण भरलेले असल्यास किंवा आवेदनपत्रासोबत आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्र साक्षांकीत करून न पाठविल्यास संबंधितांचे अर्ज अमान्य केले जातील यांची कृपया नोंद घ्यावी, हि विनंती.

धन्यवाद!

(डॉ. प्रिया गेडाम)
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## विद्यार्थी विकास विभाग

## विद्यार्थी सहाय्यता निधी नियमावली

**१) विद्यार्थी सहाय्यता निधी व्यवस्थापन समिती :—**

विद्यार्थी सहाय्यता निधीची व्यवस्था, प्रशासन, देखरेख व वितरण हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम २०१६ च्या कलम ५५(२) अंतर्गत गठीत विद्यार्थी विकास मंडळ यांच्या अधिपत्याखाली करण्यात येईल,

**२) ध्येय आणि उद्दीष्ट्ये :—**

अ) गरीब विद्यार्थ्यांना विद्यापीठीय शिक्षण घेण्यासाठी शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क, वसतीगृहातील राहाण्याचा व जेवणाचा खर्च, पुस्तकांचा व इतर शैक्षणिक साहित्यांची खरेदी यासाठी येणारा खर्च व तत्सम इतर शैक्षणिक खर्चासाठी आर्थिक सहाय्य करणे.

ब) विद्यापीठाव्दारे गरीब विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या इतर योजनांसाठी सदर निधीतुन रक्कम पुरविणे.

**३) निधी संकलन:—**

अ. संलग्नित/संचालीत महाविद्यालयांचे व पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील प्रवेशीत विद्यार्थ्यांकडून दरवर्षी प्रत्येकी रु. ५/— प्रमाणे.

ब. विद्यापीठ अनुदान आयोग व इतर वित्तीय संस्थांव्दारे प्राप्त अनुदान/अंशदान.

क. विद्यापीठ साधारण निधीतून अंशदान.

ड. देणगी व इतर प्राप्ती.

**४) निधीचे व्यवस्थापन :—**

सदर निधी कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेत कुलसचिवांचे नांवे बचत खाते उघडून जमा करण्यात येईल. तसेच ह्या खात्याचे आर्थिक व्यवहार कुलसचिव आणि वित्त व लेखा अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने केले जातील. तसेच सदर निधीचे लेखापुस्तके वित्त व लेखा अधिकारी यांचे मार्फत हाताळली जातील.

**५) सचिवांचे कर्तव्ये :—**

सदर निधी समितीचा व निधी संबंधीचा पत्रव्यवहार/अभिलेख सचिवांव्दारे किंवा त्यांनी प्राधीकृत केलेल्या अधिकाऱ्याव्दारे हाताळला जाईल. तसेच समितीने विहित केल्याप्रमाणे इतर कर्तव्ये सचिवांना पार पाडावी लागतील.

**६) विद्यार्थी सहाय्यता निधीतून आर्थिक सहाय्य मंजूर करण्याचे नियम व कार्यपध्दती.**

अ) विद्यार्थी सहाय्यता निधी विद्यार्थी विकास मंडळाद्वारे विहित केलेल्या प्रारुप आवेदनपत्रात सदर निधीतुन आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करणे व त्यानुसार